
# कांची वृत्तपत्रिका

## "कामकोटि वाणी"

### नोव्हेंबर २०२२





|| श्रीः ||

**श्रुतिस्मृतिपुराणानामालयं करुणालयम्।**
**नमामि भगवत्पादशंकरं लोकशंकरम्॥**

# सनातन धर्म

प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक परिवाराला, प्रत्येक देशाला आणि संपूर्ण जगाला मार्गदर्शन देणारा, संरक्षण करणारा धर्म आहे. मागच्या जन्मी काही गुणवत्ता संपादन  केल्यास, धर्माला योग्य रीतीने समजता येईल. ह्या जन्मीपण वेगवेगळ्या रीतीने, चांगल्या कर्मांनी गुणवत्ता संपादन करणे, हा धर्माचा संदेश आहे. आपण जे काही साध्य करतो त्याचे माप धर्माच्या प्रमाणाने करावे. आपले यश संपत्तीच्या आधारावर, सामाजिक दर्जाच्या आधारावर मापून समाधान वाटू शकते, पण फक्त धर्मासोबत मापन केल्यास सत्य आणि खरे सन्मान प्राप्त होऊ शकते.

प्रत्येक भारतीय नागरिकाच्या मनामध्ये भौतिक सुख आणि सुखसोई, धर्माच्या संरक्षणासाठी त्याग करून, जीवनामध्ये चांगले कृत्य, धर्माच्या अनुषंगाने करतात. धर्माचे विचार हे फक्त पुस्तकांमध्ये, चित्रांमध्ये बघायला नव्हे , तर धर्माचा अभ्यास आणि धर्मातले अनुभव हे आपल्या जीवनाशी संबंधित बघणे, हाच धर्म आहे.

आपले अतूट प्रयत्न आणि धर्मामधील विश्वास वाढत जाण्यासाठी कुठल्याही वेळी, मित्रांसोबत किंवा कोणत्याही वातावरणात वावरत असताना, धर्माशी संबंधित करावे. खरं तर आपण धर्माचे संरक्षण नव्हे तर धर्म आपले संरक्षण करत आहे.

# श्रीमठ संस्थान तर्फे विविध उपक्रम

## धार्मिक आणि सांस्कृतिक -


- श्री महा त्रिपुरसुंदरी अंबा समवेत श्री चंद्रमौलीश्वर स्वामींचे त्रिकाळ पूजा
- पूर्व आचार्यांच्या अधिष्ठानामध्ये पूजा कार्य
- भिक्षावंदन, पाद पूजा, द्रव्य समर्पण, इ.
- व्यास पूजा, अवतार महोत्सव (जयंती), पीठाच्या आचार्यांचे आराधन पूजा
- वेद पारायण, जप, यज्ञ आणि होम
- वाख्यार्त सदस, अग्निहोत्र सदस, पंचांग सदस आणि व्यास भारत कालडीसदस
- वेद शास्त्र पंडितांचे, अग्निहोत्रांचे, विद्वानांचे, मंदिराचे पुजारी, संगीतकार, कलाकार, शिक्षक, आणि विद्यार्थ्यांचे सन्मान
- वेद, सैवगम, वैखानसा, पंचरात्र आणि तंत्र विद्या पाठशाळा चालवणे व समर्थन करणे
- प्राचीन ग्रामीण मंदिरांचे आणि वारसा रचनांचे नूतनीकरण
- पारंपारिक कला प्रकारांचे संरक्षण

## धर्मादाय आणि मानवतावादी उपक्रम-

- नित्य अन्नदान
- विद्या आणि वैद्यकीय प्रकल्प

- गरीब कुटुंबांना मुलींचे लग्न करण्याकरिता मदत
- विविध जागी सर्व यात्रेकरूंसाठी 'यात्री निवासाची' सोय
- वस्त्र दान
- गरिबांना निवाऱ्याचे प्रदान करणे
- असक्षम व्यक्तींना घराची सोय
- वृध्दआश्रम
- पुस्तकांचे प्रकाशन आणि मोफत ग्रंथालय
- नैसर्गिक आपत्तीमध्ये प्रभावित झालेल्या लोकांना साहाय्य
- मुख्यमंत्री / पंतप्रधान मदत निधीमध्ये कल्याणकारी उपक्रमासाठी देणग्या

# श्री आदि शंकर भगवदपादा रचित काही स्तोत्र



१. अनात्मा श्री विगार्‍हाणा
२. भज गोविंदम्
३. भवानी भुजंग स्तोत्र
४. दक्षिणामूर्थी स्तोत्र
५. दश श्लोकी
६. धन्याष्टकं
७. गणेश पंचरत्न स्तोत्र
८. गौरीदशकं
९. गोविंदष्टकं
१०. हनुमंत पंचरत्नम्

**खालील लिंक द्वारे वरील श्लोकांचे बोल संस्कृतमध्ये व अर्थ इंग्रजीमध्ये :**

https://kamakoti.org/misc/shlokas.html

## श्री कांची शंकराचार्य स्वामीजी

## सुरुत्तप्पल्ली मध्ये

### एक विशेष मंदिर एक अद्वितीय संदेश

सुरुत्तप्पल्ली हे गाव चेन्नई - तिरुपती महामार्गावर, चित्तूर जिल्हा, आंध्र प्रदेश मध्ये आहे. " श्री पल्लीकोन्डीस्वर" चे मंदिर या गावामध्ये स्थित आहे. हे मंदिर जे तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश राज्यांच्या सीमेवर आहे ते या दोन राज्यांना जोडणारे एक स्थान आहे. हे मंदिर तामिळनाडूच्या सिमेवर, आरणी नदी काठावर असलेले गाव, ऊथुकोट्टाईपासून एक किलोमीटरच्या अंतरावर आहे. हे स्थान नदी काठावर आपल्या संस्कृतीचे वैभव दाखवणारे एक उदहारण आहे.

हे मंदिर खूप विषयांमध्ये अद्वितीय आहे. येथे शिव भगवान शयन स्वरूपामध्ये बघायला मिळतात.

नटराज हे शिव भगवानचे एक प्रसिद्ध स्वरूप आहे. शिव भगवान आपल्याला साधारणपणे शिवलिंगाच्या स्वरूपात दिसतात. पण इकडे शयन (झोपलेल्या) स्वरूपात दिसतायेत, का? आपल्या सर्वांना पुराणांमधून माहीत आहे की शिव भगवांनी क्षीरसागराचे मंथन घडत असताना, जगाच्या कल्याणासाठी विष प्यायले. असे मानले जाते की शिव भगवांनी या ठिकाणी येऊन अनंत शयन स्वरूप धारण केले. हे स्वरूप बघताना आपण सर्व आश्चर्यचकित होऊ कारण हे पल्लीकोन्डीस्वर मूर्ती नाही तर जिवंत स्वरूपासारखे दिसतात. शिव भगवानांनाअसे अंबाळ (देवी) च्या मांडीवर झोपून बघून जणू काही शिवलोकात आल्यासारखे वाटते.

या मंदिरामध्ये अजून एक विशेष फरक आपल्याला जाणवतो. दक्षिणामूर्ती स्वामी उपदेश (प्रवचन) देतानाच्या स्वरूपामध्ये नेहमी दिसतात.
काही ठिकाणी सनक आणि वेग वेगळ्या ऋषी भोवती घेरलेले दिसतात, पण येथे दक्षिणामूर्ती स्वामी गौरी माते सह जोडीने आशीर्वाद देताना आपल्याला दिसतात.
या गावाला एक इतिहास पण आहे. श्रीमद रामायण रचलेले वाल्मिकी ऋषी संबंधित पण हे मंदिर आहे.
वाल्मिकी ऋषींनी इकडे रामायण महाकाव्य रचण्याच्याआधी शिव भगवांना प्रार्थना केले. त्या नंतर एक स्वयंभू लिंग प्रकट झाले. वाल्मिकी ऋषींनी येथे प्रार्थना केल्यामुळे, इकडचे शिव भगवान 'वाल्मिकेश्वर' म्हणून ओळखले गेले आणि हे क्षेत्र पवित्र स्थळ ठरले. वाल्मिकेश्वर आणि मरगथांबिका देवी येथे आपल्याला जोडीने दिसतात. कुबेर गौरी देवी सह, श्री राम सीता देवी सह, भरत आणि शत्रूग्न येथे दिसतात. 'प्रदोष नंदी' येथे खूप प्रसिद्ध आहेत.
या भूमीवर श्री चंद्रशेखर सरस्वती स्वामींचे (महा पेरीवा) चरण कमल स्पर्श झाल्याने हे क्षेत्र खूप मोठे 'शिव स्थळ' झाले आहे. त्या नंतर दर्शनासाठी भक्तांची संख्या येथे वाढतच गेली आहे. ह्या भूमीच्या पवित्रतेचा हा एक पुरावा आहे. मार्च १९७९ मध्ये या मंदिराचे भव्य कुंभाभिषेक पूज्यश्री जयेंद्र सरस्वती स्वामींच्या अनुग्रहाने घडले.

आपले सर्व कार्य देवाच्या चरणामध्ये समर्पण केल्याने अवांछित प्रवृत्ती कमी होतील आणि स्वतःला पारमार्थिकामध्ये सक्षम करायला मदत होईल.



## श्री श्री शंकर विजयेंद्र सरस्वती स्वामी द्वारे कुंभाभिषेक -

बुधवारी, २३ जानेवारी २०१९ (पौष महिना ९ तारिक), सकाळी ९:३० ते १०:३० कालावधीत, शंकर विजयेंद्र स्वरस्वती स्वामींच्या उपस्थितीमध्ये कुंभाभिषेक  सादर केले. हजारो लोकांनी / भक्तांनी वाल्मिकश्वर मरगथांबिकेचे कुंभाभिषेकाचे साक्षीदार होते. भरपूर लोक या गावातून सहभागी झाले होते. वेद विद्वानांच्या आणि शिवाचाऱ्यांच्या वेद घोषणाला, त्या समयी सगळ्या कलशांना अभिषेक केले गेले. एक अद्वितीय विषय म्हणजे साठ पेक्षा अधिक मूर्तींना कुंभाभिषेक केले गेले. सत्तर पेक्षा जास्त वेद विद्वान आणि शिवाचाऱ्य सहभागी झाले होते. कुंभाभिषेक नंतर स्वामीजींनी त्यांचे अनुग्रह भाषण वितरित केले. सर्व वेद विद्वानांना आणि शिवाचार्यांना स्वामीजींनी सन्मान केले आणि ह्या कुंभाभिषेकाच्या यशासाठी कष्ट केलेल्या सर्वांना आशीर्वाद दिले. तेवढेच नव्हे तर अश्या धार्मिक सेवा, भक्तीने आणि एकनिष्ठतेने करायला सांगितले.

# श्री शंकर विजयेंद्र सरस्वती स्वामीजींचे विजय यात्रा -

## मुक्कामाला
## २८ ऑक्टोबर' २२ ते १० नोव्हेंबर' २२

### मुक्कामाला गावात स्वामीजींचे आगमन :-






**मुक्कामला गावात (आंध्र प्रदेश) घडलेलं "ब्रम्ह सप्ताह" -**

स्वामीजींच्या दैवी उपस्थितीमध्ये सात दिवसांचे वेद पारायण आणि प्रवचनाची सुरुवात मुक्कामला गावात झाले.
दक्षिण भारतातले वरिष्ठ वेदांत शास्त्र विद्वान या ब्रम्ह सप्ताहामध्ये सहभागी झाले .
१९३७ मध्ये कांची महास्वामींनी (श्री चंद्रशेकर सरस्वती स्वामी) असेच एक ब्रम्ह सप्ताह आयोजित केले होते. त्या काळी ज्या घरी चंद्रमौलीश्वरांचे पूजा घडले.


जिथे महास्वामी निवास करत होते,  ते गावाच्या वरिष्ठ रहिवासींना अजुनी लक्षात आहे.

कांची महास्वामी आणि चार दंडी संन्यासींचे छायाचित्र अजूनी काळजीपूर्वक त्यांच्या घरी संग्रहित केले आहे.






After worshipping at the Shrines of Kotipalle and Mukteswaram, the party entered the fertile land of Konaseema in the lower delta of the Godavari. The eagerness with which the public received and offered their respects to His Holiness was remarkable. Almost every Agraharam in the delta of Saptagodavari invited His Holiness. Thousands of Bhaktas in every village had darshan of His Holines. His Holiness visited Antervedi and Bramha Samvedyam also. A grand Brahma-Saptaham was performed in connection with the Sri Sankara Jayanti of Iswara year at Mukkamala, on the banks of the Kowsika-Godavari in the heart of Sapta-Godavari delta between 14th and 20th May 1937. Recital of Vedas, Bhashya Parayanams, Sahasranamarchanas, discourses on religious questions, lectures etc. were performed with the assistance of able and learned scholars including Vizianagaram Pandit Brahmasri Vedantam Seshayya Sastrigaru.



# गडीयं गावाला भेट :-

## २९- १० -२०२२








SD

# ९ व १० नोव्हेंबर' २२

मुक्कामालामध्ये मुक्काम करत असताना १९३७ मध्ये ब्रम्ह सप्ताह घडलेल्या घरी भेट दिले, त्या घरी राहणाऱ्यांना खूप आनंद झाले.

स्वामीजींनी एक शिव मंदिराला पण गेले व त्या शिवलिंगाला चांदीचे नागभरणं सुशोभित केले होते.

एक विशेष समर्पण कार्यक्रम पुरोहिथ सभा सदस्यांनी सादर केले. गोदावरी नदीच्या कालवामध्ये श्री कुमरेश आणि श्रीमती जयंती कुमरेश यांनी एक विशेष कार्यक्रम स्वामीजींसमोर सादर केले.

१० नोव्हेंबर ला स्वामीजी द्राक्षारामं कडे निघाले.









జయ జయ శంకర
హర హర శంకర








1937 సం॥రంలో తొలి బ్రహ్మసప్తాహం శ్రీ దువ్వూరి బాలకృష్ణమూర్తి,
రావ్ బహుద్దూర్ గారి స్వగృహములో జరిగిన సందర్భముగా తీసిన చిత్రం

# गोदावरी नदी आरती







# द्राक्षारामं
# १० नोव्हेंबर' २२ ते १७ नोव्हेंबर' २२

पंचक्रमा क्षेत्रांमधील, पूर्व गोदावरी येथे स्थित द्राक्षारामं, आंध्र प्रदेश मधील एक गाव आहे. येथे शिव भगवान १३ फूट असलेले शिवलिंग, माणिक्यम्बा देवी सोबत येथे दिसतात. हे प्राचीन मंदिर सर्व जण गेले हजारो वर्षांपासून पूजा करत आहेत. हे मंदिर सध्या पुरातत्व विभागेच्या अंतर्गत आहे.

श्री कांची महास्वामींनी या गावाला भेट १९३७ मध्ये दिले व पुन्हा जयंद्र सरस्वती स्वामीजींसोबत १९६७/६८ मध्ये आले होते.





## माणिक्यम्बा देवी सन्निधीं मध्ये पूजा -





# ईरगावरं

# १८ नोव्हेंबर' २२ ते २० नोव्हेंबर' २२

वेद पाठशाळेमध्ये स्वामीजींचे राहून, शिव मंदिरात श्री चंद्रमौलीश्वरांचे पूजा घडले.

वेद सभा आयोजित करण्यात आले व पाठशाळेचे अध्यापक, श्री गुल्लापल्ली सीताराम गणपती यांना सुवर्ण कंकण देऊन सन्मान करण्यात आले.

स्वामीजींनी गोशाळेला, अग्निहोत्र शाळेला आणि वेद पंडितांच्या व भक्तांच्या घरी भेट दिले.











**कांची कामकोटी पीठम, १ सालय रस्ता, कांचीपुरम, तामिळनाडू.**

**फेसबुक लिंक :**

**https://www.facebook.com/srikamakoti/**